**आमदार स्थानिक विकास कार्यक्रम क्रिडा क्षेत्रासंबंधित प्राप्त प्रस्तावांना तांत्रिक मान्यता देण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषित करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन
# नियोजन विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक: स्थाविका-०७२४ / प्र.क्र.११८ / का.१४८२**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - १६ सप्टेंबर, २०२४

**वाचा :-** १. नियोजन विभाग शासन निर्णय क्र. - स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का-१४८२, दि. १२/०७/२०१६.
२. नियोजन विभाग शासन निर्णय क्र. - स्थाविका-०५२२/प्र.क्र.६२(३) /का.१४८२,दि. २२/०६/२०२२.

**प्रस्तावना :-**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भान्वये सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आलेली आहेत. या मार्गदर्शक तत्वांमधील मुद्दा क्र. ३.२७ नुसार क्रिडा क्षेत्रासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत विविध तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. सदर तरतुदींच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावरून अनेक प्रस्ताव शासनाकडे "विशेष बाब" म्हणून मान्यता मिळणेस्तव सादर केले जातात. क्रिडा क्षेत्राशी संबंधित असलेल्या संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदींनुसार पात्र असलेल्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता ही जिल्हाधिकारी यांचेमार्फत प्रदान करण्यात येते. सबब, क्रिडा क्षेत्राशी संबंधित असलेल्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी क्रिडा विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरील सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भाधिन शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्वांमध्ये क्रिडा क्षेत्राशी संबंधित विविध प्रकारच्या प्रस्तावांना तांत्रिक मान्यता देण्यासाठी सक्षम प्राधिकारी तसेच, क्रिडा स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या संघटनासंदर्भात स्पष्टता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन परिपत्रक:-**

१. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नियोजन विभाग शासन निर्णय क्र. स्थाविका - ०६१६ / प्र. क्र. ९६ / का-१४८२, दि.१२ / ०७ / २०१६ अन्वये निर्गमित केलेल्या सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्वांमधील **मुद्दा क्र. ३.२७ नुसार** क्षेत्रीय स्तरावर मंजूरी मिळण्याबाबत दाखल करण्यात आलेल्या विविध प्रस्तांवांना तांत्रिक मान्यता प्रदान करण्यासाठी क्रिडा विभागाच्या खालील यंत्रणांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

I. क्रिडा स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या मान्यताप्राप्त क्रिडा संघटनांनी स्पर्धेच्या अंदाजपत्रकासह क्रिडा स्पर्धा आयोजनाचा परिपूर्ण प्रस्ताव संबंधित जिल्ह्याचे जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडे सादर करावा.

II. क्रिडा मंडळ / क्रिडा संस्था / एकविध संघटनेच्या मान्यतेने आयोजित स्थानिक स्वरूपाच्या **निमंत्रित जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धेला** ( रू. ५.०० लक्ष मर्यादेपर्यंत ) तांत्रिक मान्यता देण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे **जिल्हा क्रिडा अधिकारी** हे सक्षम प्राधिकारी असतील.

III. एकविध क्रिडा संघटनेद्वारा आयोजित ( अजिंक्यपद स्पर्धा / शासकीय स्पर्धा ) **जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धेला** ( रू. ५.०० लक्ष मर्यादेपर्यंत ) तांत्रिक मान्यता देण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे **जिल्हा क्रिडा अधिकारी** हे सक्षम प्राधिकारी असतील.

IV. एकविध क्रिडा संघटनेद्वारा आयोजित ( अजिंक्यपद स्पर्धा /शासकीय स्पर्धा ) **राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेला** ( रू. १०.०० लक्ष मर्यादेपर्यंत ) तांत्रिक मान्यता देण्यासाठी **क्रिडा विभागाचे विभागीय उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा** हे सक्षम प्राधिकारी असतील.

V. एकविध क्रिडा संघटनेद्वारा आयोजित ( अजिंक्यपद स्पर्धा / शासकीय स्पर्धा ) **राष्ट्रस्तरीय क्रिडा स्पर्धेला** ( रू. १२.०० लक्ष मर्यादेपर्यंत ) तांत्रिक मान्यता देण्यासाठी **आयुक्त / संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे** हे सक्षम प्राधिकारी असतील.

VI. एकविध क्रिडा संघटनेद्वारा आयोजित ( अजिंक्यपद स्पर्धा / शासकीय स्पर्धा ) **आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धेला** ( रू. १५.०० लक्ष मर्यादेपर्यंत ) तांत्रिक मान्यता देण्यासाठी **आयुक्त / संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे** हे सक्षम प्राधिकारी असतील.

VII. नोंदणीकृत क्रिडा मंडळांना **क्रिडा साहित्य खरेदी** करण्यासाठी रू. ५.०० लक्ष च्या मर्यादेत निधी उपलब्ध करून देण्याबाबतच्या **प्रस्तावास** तांत्रिक मान्यता देण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे **जिल्हा क्रिडा अधिकारी** हे सक्षम प्राधिकारी असतील.

VIII. **उपरोक्त II ते VII येथील नमुद वित्तीय मर्यादेपेक्षा अधिकचा निधी** आवश्यक असणाऱ्या बाबींना / कामांना तांत्रिक मान्यता देण्यासाठी **आयुक्त / संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे** हे सक्षम प्राधिकारी असतील.

२. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत क्रिडा क्षेत्राशी संबंधित प्राप्त प्रस्तावांना उपरोक्त नमुद सक्षम प्राधिकारी यांनी तांत्रिक मान्यता प्रदान करताना खालील अटी व शर्ती यांची पुर्तता करून मान्यता द्यावी -

अ. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत क्रिडा स्पर्धांना निधी मागणी करणाऱ्या संस्थेने सदर स्पर्धा ह्या शासकीय क्रिडा संकुलात / शासकीय जागेवर जसे की तालुका क्रिडा संकुल / जिल्हा क्रिडा संकुल / विभागीय क्रिडा संकुल अथवा इतर शासकीय क्रिडा संकुलात आयोजित करणे आवश्यक आहे. सदर स्पर्धा आयोजन कालावधीत संबंधित तालुक्यातील अथवा जिल्ह्यातील शासकीय क्रिडा संकुल उपलब्ध नसल्यास इतर जागी स्पर्धा आयोजित करता येईल. तथापि, स्पर्धा आयोजनासाठी शासकीय क्रिडा संकुल सदर स्पर्धा कालावधीत उपलब्ध नसल्याची बाब जिल्हा क्रिडा अधिकारी वा विभागीय उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांनी त्यांच्या स्वाक्षरीनिशी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

आ. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत क्रिडा संबंधित बाबींसाठी निधी मागणी करणाऱ्या संस्थेने त्यांचे मागील ३ वर्षातील लेखापरिक्षण अहवाल “अ” वर्ग सनदी लेखापालांकडून ( Chartered Accountant ) प्रमाणित केलेले असावेत.

इ. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत क्रिडा विषयक बाबींसंबंधीच्या प्रस्तावांना सक्षम प्राधिकारी यांनी तांत्रिक मान्यता देतांना प्रेक्षक गॅलरी, स्टेज यांची निर्मिती, साऊंड सिस्टीम , विद्युत व्यवस्था, कार्यक्रम प्रसिध्दी, भोजन व्यवस्था, गणवेश, प्रवास खर्च इ. बाबींसाठी खर्च होणाऱ्या रकमेचा समावेश करण्यात येऊ नये.

ई. आमदार स्थानिक कार्यक्रमांतर्गत क्रिडा क्षेत्राशी संबंधित प्राप्त प्रस्तावांना उपरोक्त नमुद सक्षम प्राधिकारी यांनी तांत्रिक मान्यता प्रदान करतांना सदर परिपत्रकासोबतच्या **विवरणपत्र - क** अन्वये प्रमाणिकरण करणे बंधनकारक असेल.

उ. जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयाकडून स्पर्धा समाप्त झाल्यानंतर क्रिडा स्पर्धेसाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीचा तपशील संबंधित क्रिडा संघटनांकडून घ्यावा.

प्रस्तुत शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२४०९१६१६०३५०३५१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUSHAMA VIVEK KAMBLI

Digitally signed by SUSHAMA VIVEK KAMBLI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARMENT, 2.5.4.20=4e799d8d86920568154662ccd3b04c6e8002ed0d48f16933f57fa95ac189b330, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9899D1573C39423ACFB8F67E9C8AEA6D8FB6B33C61F94A33819BAA81E8669F35, cn=SUSHAMA VIVEK KAMBLI
Date: 2024.09.16 16:05:44 +05'30'

**( सुषमा कांबळी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत –**

१. मा. राज्यपाल महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,राजभवन, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री ( नियोजन ) यांचे खाजगी सचिव,
३. महालेखापाल (लेखापरीक्षा) / ( लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
४. उपायुक्त ( नियोजन ), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, ( सर्व ),
५. जिल्हाधिकारी, ( सर्व ),
६. जिल्हा नियोजन अधिकारी ( सर्व ) ,
७. जिल्हा कोषागार अधिकारी ( सर्व ),
८. ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी, नियोजन विभाग,
९. निवडनस्ती, कार्या.१४८२.

## महाराष्ट्र शासन

विवरणपत्र-क

| | | |
|---|---|---|
| १ | निधी प्रस्तावित करणाऱ्या मा. आमदारांचे नाव व मतदारसंघ | १.<br>२.<br>३. |
| २ | क्रीडा स्पर्धा आयोजित करणाऱ्या / क्रिडा साहित्य वितरीत करण्यात येणाऱ्या क्रीडा मंडळ / संघटनेचे / संघटनांचे पूर्ण नाव - | |
| ३ | क्रीडा मंडळ / संघटनेचा / संघटनांचा संपूर्ण पत्ता | |
| ४ | क्रीडा स्पर्धा आयोजन करणाऱ्या संघटना संस्था नोंदणी प्रमाणपत्र ( संस्था नोंदणी ॲक्ट १८६० व १९५० चे प्रमाणपत्र ) | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही.<br>पृष्ठ क्र........ते........ |
| ५ | संघटनेच्या घटनेची मा. धर्मदाय आयुक्त यांनी मान्य केलेली सांक्षांकित अद्ययावत प्रत ध्येय, उद्दिष्टांसह जोडावी | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही.<br>पृष्ठ क्र........ते........ |
| ६ | संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची यादी रु. १००/- स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र करुन जोडावी | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही.<br>पृष्ठ क्र........ते........ |
| ७ | संघटनेच्या मागील तीन आर्थिक वर्षाचे **“अ” वर्ग सनदी लेखापाल** यांनी प्रमाणित केलेले लेखापरिक्षण अहवाल | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही.<br>पृष्ठ क्र........ते........ |
| ८ | संघटनेच्या ठरावाची प्रोसिंडींगची सत्यप्रत | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही.<br>पृष्ठ क्र........ते........ |
| ९ | स्पर्धा आयोजक संघटना ही ज्या एकविध क्रीडा संघटना/ असोसिएशन यांचेशी संलग्न आहे त्या संघटनेचे नाव व पत्ता | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही.<br>पृष्ठ क्र........ते........ |
| १० | आयोजक संस्था /संघटना **इंडियन ऑलम्पिक असोसिएशन (IOC) / महाराष्ट्र राज्य ऑलम्पिक असोसिएशन / राष्ट्रीय / राज्य एकविध क्रीडा संघटना** यांचेशी संलग्न असल्याच्या प्रमाणपत्राची सांक्षांकित प्रत | सोबत जोडलेले आहे/ जोडलेले नाही.<br>पृष्ठ क्र........ |
| ११ | सदर खेळाच्या राज्य संघटनेला / जिल्हा संघटनेला / तालुका संघटनेला **क्रीडा व युवकसेवा संचालनालय, पुणे** यांची / **महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद** यांची मान्यता असल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही.<br>पृष्ठ क्र........ |

| | | |
|---|---|---|
| १२ | सदर स्पर्धा आयोजनास संबंधित खेळाच्या एकविध क्रीडा संघटनेच्या राज्य / राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च संघटनेने आयोजक संघटनेच्या नावाने दिलेल्या परवानगी पत्राची साक्षांकित प्रत ( स्पर्धा आयोजन करणाऱ्या संस्थेच्या नावे प्रत ) | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही. पृष्ठ क्र........ |
| १३ | स्पर्धा आयोजन करणारी संस्था संबंधित खेळाच्या राज्यस्तर संघटनेस संलग्न असल्याबाबतचे प्रमाणपत्राची सांक्षांकित प्रत | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही. पृष्ठ क्र........ |
| १४ | सदर क्रिडा स्पर्धा आयोजनासाठी खर्चाचे अंदाजपत्रक व स्पर्धेविषयी माहिती संस्थेचा लेटरपॅडवर-पदाधिकारी यांच्या स्वाक्षरी व शिक्यासह ( अंदाजपत्रकात शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे स्पर्धेसाठी अत्यावश्यक क्रीडा साहित्य खरेदी, खेळाचे क्रीडांगण तयार करणे, खेळाडूंचे निवास, भोजन व्यवस्था, तसच खेळाडू पारितोषिक या बाबींवर खर्च अपेक्षित राहील ) | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही. पृष्ठ क्र........ते........ |
| १५ | स्पर्धा आयोजनाचा सविस्तर कार्यक्रम, वेळापत्रकासह व त्या अनुषांगिक असलेली कागदपत्रे (स्पर्धा निमंत्रण पत्रिकेसह ) | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही. पृष्ठ क्र........ते........ |
| १६ | मंजूर अनुदान त्याच कारणास्तव खर्च करण्याचे संस्थचे हमीपत्र | सोबत जोडलेले आहे / जोडलेले नाही. पृष्ठ क्र........ |
| १७ | संघटनेमार्फत यापूर्वी घेण्यात आलेल्या अनुदानाचा तपशिल | सादर केलेला आहे / लागू नाही. पृष्ठ क्र........ते........ |
| १८ | स्पर्धा आयोजक संघटनेने यापूर्वी कोणत्याही स्पर्धेसाठी शासकीय अनुदान घेतले होते काय? असल्यास त्याबाबतचा तपशिल ( निधी वितरणाचे आदेश इ. ) | सादर केलेला आहे / लागू नाही. पृष्ठ क्र........ |
| १९ | झालेल्या एकूण खर्चाचे ऑडिट रिपोर्ट | सादर केलेला आहे / लागू नाही. पृष्ठ क्र........ते........ |
| २० | यापूर्वी घेतलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र, “अ” वर्ग सनदी लेखापालांच्या (सी.ए.) स्वाक्षरी व शिक्यानिशी | सादर केलेला आहे / लागू नाही. पृष्ठ क्र........ |

# तांत्रिक मान्यता प्रमाणिकरण

विवरणपत्र – क

**मी श्री**...................................., जिल्हा क्रीडा अधिकारी ( जिल्ह्याचे नाव ), विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा कार्यालय ( विभागाचे नाव ) / आयुक्त , क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे असे प्रमाणित करतो की, **आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत** ............................( आयोजक क्रीडा संस्था / क्रिडा संघटना / क्रिडा मंडळ यांचे पुर्ण नाव ) ................................**या संस्थेमार्फत**...................( स्पर्धेचे संपूर्ण ठिकाण तालुका / जिल्हा ) ....................................................**येथे** दि.... /..../२०२४ ते दि..../..../२०२४ **या कालावधीत आयोजित होणाऱ्या** जिल्हास्तरीय / राज्यस्तरीय / राष्ट्रस्तरीय / आंतरराष्ट्रस्तरीय....................................( स्पर्धेचे नाव )....................................**या स्पर्धेवरील खर्च भागविण्यासाठी एकूण**...................( संख्या )..................**आमदार महोदयांनी** रु.---.--- **लक्ष एवढा निधी प्रस्तावित केलेला आहे. सदर**, जिल्हास्तरीय / राज्यस्तरीय / राष्ट्रस्तरीय / आंतरराष्ट्रस्तरीय.............................( स्पर्धेचे नाव )..........**या स्पर्धेस तांत्रिक मान्यता प्रदान करण्यासाठी** ( आयोजक क्रीडा संस्था / क्रिडा संघटना / क्रिडा मंडळ यांचे पुर्ण नाव ) **या संस्थेने सादर केलेली सर्व माहिती व सोबत जोडलेली सर्व कागदपत्रे मी व्यक्तीश: तपासलेली असून सर्व कागदपत्रे सत्य असल्याचे आढळून येत आहे.**

...............( आयोजक क्रीडा संस्था / क्रिडा संघटना / क्रिडा मंडळ यांचे पुर्ण नाव )......... **या संस्थेमार्फत** ..........................................( स्पर्धेचे संपूर्ण ठिकाण तालुका / जिल्हा ) ......................**येथे** दि..../..../२०२४ ते दि..../..../२०२४ **या कालावधीत आयोजित होणाऱ्या** जिल्हास्तरीय / राज्यस्तरीय / राष्ट्रस्तरीय / आंतरराष्ट्रस्तरीय ................... ( स्पर्धेचे संपुर्ण नाव )......................**या स्पर्धेस आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत रु.** --.-- **लक्ष इतका निधी वितरीत करण्याच्या प्रस्तावास मी आज** दि...../...../२०२४ **रोजी तांत्रिक मान्यता प्रदान करत आहे**.

स्थळ :-

कार्यालयाचे नाव :-

दिनांक :- ...../...../ २०२४

स्वाक्षरी

( सक्षम प्राधिकाऱ्याचे नाव, पदनाम आणि शिक्का )